





साप्ताहिक

# डोंगरचा राजा

www.dongarcharaja.com

वडवणी तालुक्यातील पहिले मराठी वृत्तपत्र

संपादक : अनिल वाघमारे








■ वर्ष १० ■ अंक २८ ■ शुक्रवार, दि. १७ जानेवारी २०२५ ■ RNI No. : MAHMAR/2015/62614 ■ पोस्टल परवाना : L. SB/Beed/RNP-219/2024-2026 ■ email:dongarcharaja@gmail.com ■ पाने ४ ■ किंमत १ रु.


# आका १७-१७ मोबाईल वापरत होता

## आ.सुरेश धस यांचा आरोप;पन्नास लोकांना महिन्याला पैसे पाठवले जायचे

मुंबई:प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी अपहरण करून हत्या करण्यात आल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर संपूर्ण राज्यात मोठी खळबळ उडाली. यानंतर या प्रकरणातील आरोपींना पोलिसांनी अटक केलं. मात्र, या हत्येच्या घटनेतील एक आरोपी अद्यापही फरार आहे. तसेच खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडसह हत्या प्रकरणातील आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आल्यानंतर वाल्मिक कराडला एसआयटीने ताब्यात घेतलं असून न्यायालयाने आता सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, संतोष देशमुख हत्या प्रकरणात उज्ज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्याची मागणी भाजपा आमदार सुरेश धस यांनी केली होती. आता याबाबत मुख्यमंत्री लवकरच उज्ज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्याबाबत त्यांची भेट घेणार आहेत, अशी माहिती सुरेश धस यांनी दिली. तसेच यावेळी सुरेश धस यांनी संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेबाबत बोलताना आका हा सोपा आका नाही, ठराविक लोकांना प्रत्येक महिन्याला पैसे देत होता, असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

सुरेश धस काय म्हणाले?

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणासंदर्भात माध्यमांशी बोलताना सुरेश धस यांनी म्हटलं की, ''बीडच्या प्रकरणात सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करायची असल्याची माहिती मला मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. मला वाटतं की ते दिल्लीला जाण्यापूर्वी किंवा आल्यानंतर ते उज्ज्वल निकम यांची



भेट घेतील'', असं सुरेश धस यांनी म्हटलं आहे.

धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याबाबत धस काय म्हणाले?

''मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेणं आणि न घेणं हा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा अंतर्गत प्रश्न आहे. त्यामुळे मी राष्ट्रवादीमधील अंतर्गत असलेल्या विषयांवर बोलणार नाही. मात्र, राष्ट्रवादी पक्षाचा कोणावर दबाव वाढला आहे का? की नाही? किंवा कोणावर दबाव नाहीच. याबाबत जो काही विचार करायचा तो पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी करावा. सुनील तटकरे, प्रफुल पटेल, छगन भुजबळ यांनी धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याबाबत निर्णय घ्यावा. माझ्या सारख्या व्यक्तीने राष्ट्रवादीतील अंतर्गत गोष्टींवर काय बोलावं?'', असं सुरेश धस यांनी म्हटलं.

'जर एखादी त्रुटी राहिली तर'

''संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात जर पोलिसांकडून एखादी जरी त्रुटी राहिली तर न्यायालयीन चौकशीत कोणतीही त्रुटी राहू शकत नाही. मग जे कोणी आका, बाका, चाचा, मामा हे या प्रकरणातील सर्व लोक आहेत, ज्यांनी-ज्यांनी संतोष देशमुख यांची हत्या केली त्या सर्वांची न्यायालयीन चौकशी होईल आणि आरोपींना फाशीची शिक्षा होईल अशी अपेक्षा आहे. जो आका आहे, तो आका सोपा आका नाही. आका १७-१७ मोबाईल वापरत होता. त्यामुळे आका काहीही करू शकतो. तसेच आका काही ठराविक लोकांना प्रत्येक महिन्याला पैसे पाठवत होता'', असा गंभीर आरोप आमदार सुरेश धस यांनी केला आहे.

दरम्यान, वाल्मिक कराडची पत्नी मंजिली कराड यांनी आमदार सुरेश धस आणि खासदार बजरंग सोनवणे यांच्यावर माध्यमांशी बोलताना काही आरोप केले होते. तसेच वाल्मिक कराडवर मकोका चुकीच्या पद्धतीने लावण्यात आला असल्याचं त्यांनी म्हटलं होतं. दरम्यान, मंजिली कराड यांनी केलेल्या आरोपासंदर्भात आमदार सुरेश धस यांनी आपण काहीही बोलणार नसल्याचं म्हटलं आहे.

## लाडक्या बहिणींना १५०० रुपयांऐवजी २१०० रुपयांचा हप्ता?

मुंबई:प्रतिनिधी

विधान सभेच्या निवडणुकी आधी महायुती सरकारने लाडकी बहीण योजना सुरु केली. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील लाभार्थी महिलांना १५०० रुपये देण्यात येतात. मात्र, विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात महायुतीने लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना १५०० रुपयांवरून पुन्हा महायुतीचं सरकार आल्यास २१०० रुपये वाढीव निधी देऊ अशी घोषणा केली होती. विधानसभेच्या निवडणुकीनंतर राज्यात पुन्हा महायुतीचं सरकार सत्तेत आलं. मात्र, राज्य सरकारने अद्याप लाडक्या बहिणींना २१०० रुपये वाढीव निधी देण्याच्या संदर्भात कोणताही निर्णय घेतला नाही. त्यामुळे २१०० रुपये लाडक्या बहिणींना मिळणार की नाही? तसेच मिळणार असतील तर कधी? याबाबत वेगवेगळे सवाल उपस्थित करण्यात येत आहेत. यावरून विरोधकांनीही अनेकदा सवाल उपस्थित केले आहेत. दरम्यान, आता यासंदर्भात महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी महत्वाची माहिती दिली आहे.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी लाडक्या बहिणींना २१०० रुपये मिळणार की नाही? याबाबत भाष्य केलं आहे. आदिती तटकरे यांनी म्हटलं की, ''आम्ही याबाबत आधीही अनेकदा स्पष्टीकरण दिलं आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील यासंदर्भात स्पष्टीकरण दिलेलं आहे. आता नवीन अर्थसंकल्प मांडण्यात आल्यानंतर राज्यातील लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल. मात्र, तोपर्यंत तरी लाडक्या बहिणींना १५०० रुपयांचाच लाभ आपण देणार आहोत'', अशी माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

''लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता आपण २५ डिसेंबर ते ३० डिसेंबर या दरम्यान दिला. आता लाडकी बहीण योजनेचा जानेवारीचा हप्ता राज्य सरकार २६ जानेवारीच्या आधी वितरित करण्यास सुरुवात करेल. यासंदर्भात आर्थिक नियोजन आम्हाला अर्थखात्याकडून महिला व बाल विकास विभागाला प्राप्त झालं आहे. त्यामुळे आता जानेवारी महिन्याचा लाडक्या बहिणींना लाभ देण्यास २६ जानेवारीच्या आधी सुरुवात करण्यात येणार आहे'', अशी माहिती आदिती तटकरे यांनी दिली.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीत महायुतीला भरघोस यश मिळवून देणाऱ्या 'लाडकी बहीण' योजनेतील लाभार्थी महिलांना दिल्या जाणाऱ्या निधीत सध्या तरी कोणतीही वाढ होणार नसल्याचं आदिती तटकरे यांनी दिलेल्या माहितीवरून स्पष्ट झालं आहे. त्यामुळे आता अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर वाढीव हप्त्यासाठी काही तरतूद राज्य सरकार करणार का? तसेच त्यानंतर लाडक्या बहिणींना २१०० रुपयांचा वाढीव हप्ता मिळणार का? हे अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतरच स्पष्ट होईल.

## मंत्री पंकजा मुंडे घेणार मुख्यमंत्र्यांची भेट

बीड : प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी अपहरण करून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेनंतर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली होती. त्यानंतर या प्रकरणातील आरोपींना पोलिसांनी अटक केलं. मात्र, या प्रकरणातील एक आरोपी अद्यापही फरार आहे. तसेच खंडणी प्रकरणातील आरोपी बाल्मिक कराडचा संतोष देशमुख हत्या प्रकरणात सहभाग असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर वाल्मिक कराडसह संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेतील सर्व आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कलमान्वये (मकोका) कारवाई करण्यात आली आहे.


मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आल्यानंतर वाल्मिक कराडला एसआयटीने ताब्यात घेतलं. त्यानंतर आज वाल्मिक कराडला २२ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली. वाल्मिक कराडला बीड न्यायालयाने ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावल्यानंतर

न्यायालयाच्या बाहेर वाल्मिक कराडच्या समर्थकांनी मोठा गोंधळ केला. न्यायालयाच्या बाहेर जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन केलं. तसेच काही ठिकाणी टायर देखील जाळले.



त्यामुळे काहीवेळ मोठा तणाव निर्माण झाला होता. मात्र, त्यानंतर पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली.

दरम्यान, वाल्मिक कराडवर मंगळवारी मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आल्यानंतर परळीत तणाव निर्माण झाला होता. परळी बंदची हाक वाल्मिक कराडच्या समर्थकांनी दिली होती. तसेच काही व्यापाऱ्यांनी दुकाने बंद केली होती. त्यामुळे ऐन संक्रातीच्या दिवशी परळीतील बाजारपेठ बंद होत्या. दरम्यान, या संपूर्ण परिस्थितीवर काल (१५ जानेवारी) भाजपाच्या नेत्या तथा मंत्री पंकजा मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना प्रतिक्रिया देत भाष्य केलं. तसेच बीड जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या परिस्थिवर पंकजा मुंडे यांनी आपण लवकरच यासंदर्भात गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार असल्याचं स्पष्ट केलं.बीडमध्ये काय सुरु आहे, याबाबत मला माहिती नाही. मी माझ्या दररोजच्या नियोजनाप्रमाणे काम करत आहे. त्यामुळे या गोष्टी माझ्यासाठी मॅटर करत नाहीत. माझ्यासाठी माझं दररोजचं काम महत्वाचं आहे, असं मंत्री पंकजा मुंडे यांनी म्हटलं. तसेच परळीसह बीडमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे, असं माध्यमांच्या प्रतिनिधींनी पंकजा मुंडे यांना विचारलं असता त्या म्हणाल्या की, बीड जिल्ह्यातील तणावाबाबत मी गृहमंत्र्यांशी चर्चा करणार आहे. तसेच जिल्ह्यातील तणाव कणी करण्यासाठी काय करता येईल ते ठरवणार आहे, असं पंकजा मुंडे यांनी म्हटलं.



## धनंजय मुंडेंचा परळीत जनता संवाद, जगमित्र कार्यालय गजबजले

परळी : प्रतिनिधी

नियमित प्रमाणे परळीत आल्यानंतर आज राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी परळी येथील आपल्या जगमित्र या कार्यालयामध्ये बसून मतदारसंघातून व मतदारसंघ

बाहेरून आलेल्या नागरिक कार्यकर्ते तसेच पदाधिकारी यांच्याशी संवाद साधत त्यांची कामे अडचणी समजून घेतल्या तसेच ती मार्गी लावण्याबाबत संबंधितांना योग्य त्या सूचना देत संबंधितांची कामे मार्गी लावली.

जागच्याजागीच काम मार्गी लावण्याचा शैलीमुळे धनंजय मुंडे यांच्या जनता संवाद उपक्रमास नेहमीच गजबजलेली गर्दी पाहायला मिळते. आजही धनंजय मुंडे जगमित्र कार्यालयात दाखल झाल्यानंतर पदाधिकारी कार्यकर्ते त्याचबरोबर परळी व परळी बाहेरील नागरिकांनी जगमित्र हे धनंजय मुंडे यांचे कार्यालय गजबजलेले पाहायला मिळाले.

मंत्री धनंजय मुंडे हे परळीत असल्यानंतर नियमित प्रभू वैद्यनाथांच्या दर्शनाला जातात. आजही घराबाहेर पडतात त्यांनी सर्वप्रथम बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथांचे मनोभावे दर्शन करून विधिवत पूजन केले व त्यानंतर ते जनता संवाद उपक्रमासाठी त्यांच्या जगमित्र या कार्यालयात दाखल झाले.

## वडवणीच्या तरुणाचा चाकुने गळा चिरून केला खुन

### तू कॉलर का उडवतोस? म्हणून हत्या केल्याचा संशय

वडवणी : प्रतिनिधी

छत्रपती संभाजी नगर येथे पदवीचे शिक्षण घेणाऱ्या बीसीएसच्या विद्यार्थ्याची फ्लॅटमध्ये गळा चिरून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. प्रदीप विश्वनाथ निपटे (वय १९) रा.पिंपरखेड ता. वडवणी जि.बीड या विद्यार्थ्याची अज्ञात हल्लेखोरांनी निघृण हत्या केली आहे.



प्रदीपच्या हत्येमागे महाविद्यालयात झालेल्या वादाची पार्श्वभूमी असल्याचा प्राथमिक संशय पोलिसांकडुन व्यक्त केला जात आहे. शनिवारी महाविद्यालयातील काही मुलांसोबत किरकोळ कारणावरून वाद झाला होता. या वादावेळी ''तू एकटक का पाहतोस?'', ''तू कॉलर का उडवतोस?''

अशा कारणांवरून वादविवाद होऊन हाणामारी झाली होती. संक्रांतीच्या रात्री प्रदीपचे मित्र बाहेर गेले असताना मारेकऱ्यांनी फ्लॅटमध्ये घुसून त्याची गळा चिरून हत्या केली. ही धक्कादायक घटना मंगळवारी रात्री ११: ३० वाजता उस्मानपुऱ्यात उघडकीस आली. प्रदीप मूळचा बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील पिंपरखेड येथील असून देवगिरी महाविद्यालयात बीसीएसच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत होता. तो आपल्या एका मावस भाऊसह अन्य तीन मित्रांसोबत भाजीवालीबाई पुतळ्याजवळील एका अपार्टमेंटमध्ये भाड्याने राहत होता.

मंगळवारी सर्व जण महाविद्यालयातून फ्लॅटवर परतले होते. सायंकाळी त्याचा भाऊ आणि अन्य मित्र बाहेर गेले होते, परंतु प्रदीप मात्र फ्लॅटवर थांबला होता. रात्री १० वाजता त्याचे भाऊ आणि मित्र परतले, तेव्हा त्यांनी प्रदीपला गळा कापलेल्या आणि रक्तबंबाळ अवस्थेत मृत पाहिले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून पोलिसांनी गुन्ह्याचा तपास सुरू केला आहे. हत्येमागील कारणांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून अधिक सखोल चौकशी केली जात आहे.

## 'धनंजय मुंडे सरकारवरील डाग, त्यांच्या गुंडाची टोळी थांबवा:मनोज जरांगेंचा इशारा

बीड :

बीडमधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण मागील काही दिवसांपासून चर्चेत आहे. या प्रकरणातील आरोपींना पोलिसांनी अटक केलेलं आहे. तसेच खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडचा सहभाग संतोष देशमुख हत्या प्रकरणात असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, वाल्मिक कराडवर मोकोका कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आल्यानंतर एसआयटीने वाल्मिक कराडला काल बीड न्यायालयात हजर केलं होतं. यावेळी न्यायालयाने वाल्मिक कराडला ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

वाल्मिक कराडला ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावल्यानंतर न्यायालयाच्या

बाहेर वाल्मिक कराडच्या समर्थकांनी जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे काहीवेळ न्यायालयाच्या बाहेर गोंधळाचं वातावरण निर्माण झालं होतं. या संदर्भात आता मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया देत राज्य सरकारला इशारा दिला आहे. तसेच धनंजय मुंडे यांच्यावरही त्यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. 'धनंजय मुंडे सरकारवरील डाग आहेत, त्यांच्या गुंडाची टोळी थांबवा, अन्यथा आम्ही हे सहन करणार नाहीत', असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला दिला आहे.

मनोज जरांगे काय म्हणाले ?

संतोष देशमुख यांच्याबाबत आरोपींना काहीही दया आली नाही, आरोपींनी मजा घेतली. तसेच खंडणीतील आरोपीने वाचण्यासाठी

सरकारमधील मंत्र्याला फोन केला असेल. खंडणीतील आरोपी, खुनातील आरोपी यांनी कोणाला फोन केले? कोण कोणाला भेटलं? हे सर्व चार्जशीट मध्ये यायला पाहिजे. सरकारने आता म्हणू नये की आम्हाला हे आढळून आलं नाही, आणि ते आढळून आलं नाही. या प्रकरणातील एकही आरोपी सुटता कामा नये. ही सर्व जबाबदारी आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आहे. परळीला लागलेला हा डाग आणि धनंजय मुंडेंची टोळी आहे, ही टोळी थांबली पाहिजे, असा हल्लाबोल मनोज जरांगे यांनी केला.

वाल्मिक कराडला न्यायालयाने ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. यानंतर न्यायालयाबाहेर वाल्मिक कराडच्या समर्थकांनी घोषणाबाजी केली. यासंदर्भात

बोलताना मनोज जरांगे यांनी म्हटलं की, यासाठीच धनंजय मुंडे आले होते. संतोष देशमुखांच्या कुटुंबियांना भेटण्यासाठी धनंजय

मुंडेंना माणुसकी राहिली नाही. त्यांना फक्त पद आणि पैसे पाहिजेत. खंडणीतील आरोपी हा हत्या प्रकरणातील आरोपी आहे. बीड जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहिली पाहिजे. मात्र, धनंजय मुंडेंना राज्यात दंगली घडवायच्या आहेत. त्यांचं पाप झाकण्यासाठी

त्यांची टोळी रस्त्यावर उतरवली जात आहे. धनंजय मुंडेंना जातीय दंगली घडवायच्या आहेत, मात्र, मुख्यमंत्र्यांनी त्यांना थांबवावं.

अशा टोळीमुळे सर्वसामान्य लोकांना त्रास झाला तर आम्ही सहन करणार नाहीत असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला.

आरोपींना सोडून द्या, यासाठी आंदोलन करणाऱ्यांच्या घरी जाऊन धनंजय मुंडे भेटतात. त्यामुळे जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था धनंजय मुंडे

यांना चांगली ठेवायची नाही का? कारण न्यायालयासमोर जाऊन गोंधळ करतात आणि पोलिसांनी दादागिरी करु नये, असं हे बोलतात. ही भाषा धनंजय मुंडेंच्या टोळीची आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारला हा डाग आहे.

सरकारला डाग लावण्याचं काम धनंजय मुंडे करत आहेत. आम्हाला आता त्यांच्याबाबत शंका बायला लागली आहे. पण देवेंद्र फडणवीस आणि अजित पवारांना माझं आवाहन आहे की बीड जिल्ह्याची कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहिली पाहिजे. त्यासाठी धनंजय मुंडेंच्या गुंडाची टोळी थांबवा, जर हे आरडाओरडा करायला लागले तर आम्ही सहन करणार नाहीत, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला.

## संपादकीय

# टोरेसची धाड

दर काही महिन्यांनी महाराष्ट्रात नवीन आर्थिक घोटाळा उघडकीस येतो. त्याचे स्वरूपही जवळपास सारखेच असते. पद्धत वेगळी असते इतकेच. मात्र, या साऱ्या घोटाळयांमधील समान सूत्र म्हणजे गुंतवणूकदारांना जास्तीत जास्त परतावा कमीत कमी काळात देण्याची हमी. एका बाजूला राष्ट्रीयीकृत बँका व्याजाचे दर एक टक्काच नव्हे, तर टक्क्याच्या एक दशांश म्हणजे एका पॉइंटने कमी-जास्त करताना प्रचंड आकडेमोड आणि हिशेब करतात आणि दुसरीकडे, अचानक जन्माला येणाऱ्या उपटसुंभ कंपन्या किंवा स्कीम्स गुंतवणूकदारांना २४, ३६, ४८ टक्के असे वाट्टेल ते व्याजदर द्यायला तयार असतात.

भारत हा आर्थिक महासत्ता होणार असला आणि देशातील काही उद्योग भरभराटीला येत असले तरी जगातली कोणतीही वित्तसंस्था इतके भरघोस व्याज दीर्घकाळ देऊ शकत नाही. तसे शक्यही नसते. असे असूनही अशा फसव्या कंपन्या जन्माला येत असतात. त्या काही काळ शेकडो, हजारो ग्राहकांना कोट्यवधी रुपयांना गंडा घालतात आणि नंतर गायब होतात. त्यांच्या प्रवर्तकांना कधी शिक्षा होते, कधी होत नाही. मात्र, सामान्य नागरिकांचे बुडालेले सर्व पैसे परत मिळाले आहेत, असे एकदाही घडत नाही. मुंबईतील टोरेस कंपनीतील घोटाळा हा असाच असून त्याची व्याप्ती समजायला वेळ लागेल. याचे कारण केवळ काही महिन्यांत या कंपनीने अनेक कार्यालये उघडून असंख्य ग्राहकांना फसविले आहे.

भारतात दर वर्षी अशा योजनांमध्ये लक्षावधी सामान्य नागरिक, मध्यमवर्गीय फसतात. टोरेस कंपनीने अगदी अल्पावधीत आपल्या दागिन्यांच्या शोरूम्स आणि ऑफिसांमध्ये आलेल्या एक लाख ते सव्वा लाख लोकांना गंडा घातला असावा. गुंतवणूक करणाऱ्या शेकडो ग्राहकांना गुंतवणुकीचा लाभांश म्हणून दिलेले 'हिरे' हे प्रत्यक्षात साधे काचेचे मणी होते. पण 'टोरेस'च्या कार्यालयांना टाळे लागल्यावर आणि काही संशयितांना अटक झाल्यावरच गुंतवणूकदारांना ही काच असल्याचे का समजावे? त्यांनी आधीच या खड्यांचे परीक्षण का करून घेऊ नये? किंबहुना, इतके प्रचंड व्याज कोणतीही गुंतवणूक देऊ शकत नाही, इतके सामान्य आर्थिक ज्ञान आपल्याला का नसावे? मुंबईतच या कंपनीने दागिन्यांची किमान सहा दुकाने उघडली. तेथे सोन्याच्या खरेदीवर ४८ टक्के, चांदीच्या खरेदीवर ९६ टक्के आणि हिरे किंवा मौल्यवान खड्यांच्या खरेदीवर तर तब्बल ५२० टक्के परतावा मिळण्याची हमी देण्यात आली.

दर आठवड्याला मिळणारा परतावा आणि सुरुवातीला विश्वास संपादन करण्यासाठी मिळणारी रक्कम, यामुळे हजारो ग्राहक या दागिन्यांच्या दुकानांमध्ये गर्दी करू लागले. सारे उघड झाल्यानंतर, आता आपण फसलो आहोत, असे कबूल करून सर्वच ग्राहक किंवा गुंतवणूकदार पुढे येणार नाहीत. पण हा सगळा व्यवहार शंभर कोटींच्याही वर गेला असावा. काळा पैसा कुठे ठेवायचा, याची चिंता असणारे धनाढ्य अशा योजनांमध्ये सहसा फसत नाहीत आणि फसले तरी त्यांना पैसे गेल्याची चिंता नसते. मात्र, जास्त परताव्याच्या लोभापायी अशा कंपन्यांच्या दारात जाणारे मध्यमवर्गीय किंवा निम्न-मध्यमवर्गीय चरकांमध्ये चिरडले जातात आणि नंतर नशिबाला बोल लावण्याखेरीज त्यांच्या हातात काही राहात नाही.

खरे तर, फसवे उद्योग उभे राहतात, त्यांची दुकाने सजतात आणि शेकडो लोक अशा कंपन्यांकडे धाव घेतात; तेव्हाच पोलिस व इतर यंत्रणांना त्याचा सुगावा लागायला हवा. 'तुम्ही ४८ टक्के व्याज कसे काय देणार आहात?' हा प्रश्न या कंपन्यांना आधीच विचारणारी कोणतीही यंत्रणा नसावी आणि असली तर ती निष्प्रभ ठरावी, हे कशाचे लक्षण आहे? टोरेस हे या दागिन्यांच्या दुकानांचे नाव असले तरी ही मूळ कंपनी 'प्लॅटिनम हर्न प्रायव्हेट लिमिटेड' या नावाची आहे.या कंपनीशी संबंधित सगळे अद्याप पोलिसांना सापडलेले नाहीत. 'आमची निदान मूळ गुंतवणूक तरी परत करा...' असा आक्रोश आता शेकडो छोटे-मोठे गुंतवणूकदार करीत असले तरी लुटलेला पैसा एव्हाना भारत ओलांडून परकीय भूमीवरही गेलेला असू शकतो. बँका कमी व्याज देतात, शेअर बाजार अस्थिर असतो आणि महागाई वाढत असते... हे सगळे खरे असले तरी आपले कष्टाचे पैसे नादान लोकांच्या हातात देऊन फसायचे नाही, हे आपल्या मध्यम वर्गाला शिकावेच लागेल. आर्थिक अडाणीपण ही सबब होऊ शकत नाही. त्याची शिक्षा मग अशी भोगावी लागते.

# डिजिटल मीडिया परिषदेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी सहभागी व्हावे:प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे

पुणे:प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषद आयोजित आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा आणि भव्य राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजन येत्या १ फेब्रुवारी २०२५ रोजी सेलू या ठिकाणी करण्यात आले असून या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हा व तालुका पदाधिकारी आणि सदस्यांनी आवर्जून उपस्थित रहावे.असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार व परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर सह राज्यस्तरीय पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली परिषदेच्या वतीने प्रत्येक वर्षी महाराष्ट्र राज्यातील आदर्श जिल्हा व

तालुका पत्रकार संघांना यथोचित सन्मान करून राज्यातील प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने गौरविले जाते. या वर्षी देखील परभणी जिल्ह्यातल्या सेलू या तालुका ठिकाणच्या शहरामध्ये हा भव्य सोहळा येत्या एक १ फेब्रुवारी २०२५ रोजी होत आहे. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त माननीय श्री.एस.एम. देशमुख यांनी काही दिवसांपूर्वीच या ठिकाणी

भेट देऊन सेलु पत्रकार संघाची बैठक घेत पदाधिकाऱ्यांकडून आढावा घेतला. या आढावा बैठकीसाठी आम्ही स्वतः उपस्थित होतो. हा भव्य पुरस्कार वितरण सोहळा व राज्यस्तरीय मेळावा फक्त एक दिवसाचा असणार आहे. राज्यभरातुन मुक्कामी येणाऱ्या पत्रकार बांधवांच्या निवासस्थानाची व भोजनाची व्यवस्था सेलु तालुका पत्रकार संघाकडून करण्यात आली आहे. मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न असलेली ही डिजिटल मिडिया परिषद आहे. महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेच्या जिल्हा आणि तालुका पदाधिकारी व सदस्यांनी या मेळाव्यात सहभागी होणे बंधनकारक आहे. डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष संतोष शिंदे,उपाध्यक्ष

अनिल उंबरकर, प्रदेश सदस्य अनिल धुपदाळे कोल्हापूर ,प्रदेश सदस्य जितेंद्र सिरसाठ बीड मराठवाडा,प्रदेश सदस्य तानाजी जाधव सांगली, प्रदेश सदस्य मल्हार पवार कर्जत रायगड, प्रदेश सदस्य शेख अफताब अहिल्याबाईनगर या सर्व राज्यस्तरीय पदाधिकारी यांनी जबाबदारी घ्यावी.आपणास व इतर पदाधिकारी यांचे काही म्हणणे असल्यास आम्हाला ९८२२५४८६९६ या मोबाईल नंबर वर संपर्क साधावा असे आवाहनही डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.



# पुरस्कारामुळे अधिक काम करण्याची शक्ती:वानखेडे

वडवणी :प्रतिनिधी

वडवणी तालुक्या मधील खमक्या, जिगरबाज, डॅशिंगबाज,निर्भीड महिला पत्रकार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पत्रकार गितांजली लव्हाळे वानखेडे मॅडम यांच्या कार्याची दखल घेऊन

बीड येथील मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणार राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार काल दि.१२ जानेवारी २०२५ रविवार रोजी बीड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या शानदार कार्यक्रमात माजी आमदार उषाताई दराडे

ह.भ.प.राधाताई महाराज,ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे, समाजसेवक संजय कोठारी यांच्यासह इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये देऊन गितांजली मॅडम यांचा सन्मानित करण्यात आले. गितांजली लव्हाळे वानखेडे मॅडम यांना आदर्श राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

वडवणी तालुक्यामध्ये खमक्या, जिगरबाज, डॅशिंग, निर्भीड महिला पत्रकार म्हणून गितांजली लव्हाळे वानखेडे मॅडम यांना ओळखले जात आहे. त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक महिलांना गोरगरीब नागरिकांना येणाऱ्या अडीअडचणी सोडवण्याचे काम केले आहे. तसेच त्यांनी वडवणी पोलीस स्टेशन अंतर्गत महिला दक्षता कमिटीच्या सदस्य म्हणून यशस्वी काम करत आहेत .

यावेळी त्यांनी अनेक महिलांना मदत आणि न्याय मिळवून दिला. त्याच बरोबर त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलनासाठी भरीव काम करत आहेत. त्या नेहमी गरजू महिलांना मोफत साड्यां व गरीब विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप करतात. या त्यांच्या सर्व कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक नामांकित व्यक्तिंनी आणि संस्थानी पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. नुकतेच त्यांच्या सर्व कार्याची कार्याची दखल घेऊन बीड येथील मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने त्यांना राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर केला होता. या पुरस्काराच्या वितरण

राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून काल १२ जानेवारी रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य दिव्य कार्यक्रमात आदर्श पत्रकार पुरस्कार माजी आमदार उषाताई दराडे, ह.भ.प.राधाताई महाराज, ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे, समाजसेवक संजय कोठारी यांच्यासह इतर मान्यवरांच्या शुभहस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. सदरील पुरस्कार मिळाल्याबद्दल गितांजली लव्हाळे वानखडे मॅडम यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षा होत आहे.

राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार स्वीकारल्यानंतर या पुरस्काराला उत्तर देताना निर्भीड महिला पत्रकार गितांजली लव्हाळे मॅडम म्हणाल्या की, मी जे कार्य मी करत आहे, त्या कार्याची दखल घेऊन त्याचा गौरव होत याचा मला मनस्वी आनंद होत आहे. या पुरस्कारामुळे आणखीन कार्य करण्याची शक्ती प्रेरणा आणि स्फूर्ती मला मिळाली आहे. त्यामुळे मी अधिक जोमाने काम करणार आहे




# विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर वाढविण्यासाठी सर्वंकष प्रयत्नांची गरज - बाबासाहेब उजगरे

वडवणी:प्रतिनिधी

जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा वडवणी या केंद्राची माहे जानेवारी महिन्याची मासिक शिक्षण परिषद जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कान्हापूर याठिकाणी दि.११ जानेवारी २०२५ शनिवार रोजी मोठ्या खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या शिक्षण परिषदेच्या अध्यक्षस्थानी केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश करांडे होते तर मुख्य मार्गदर्शक अतिथी म्हणून वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे तसेच सरपंच सौ.खताळ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीकृष्ण खताळ, केंद्रिय मुख्याध्यापक श्रीमती.तिडके मॅडम यांसह अन्य उपस्थित होते.

यावेळी सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सावित्रीबाई फुले, राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश करांडे सुरेश यांनी केले. आपल्या प्रास्ताविकामध्ये त्यांनी विद्यार्थी अध्ययन स्तर व लोकसहभाग याविषयी मार्गदर्शन केले. समाजाच्या सहभागातून शाळेच्या भौतिक गरजा पूर्ण होतात विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीस पालकांचा सहभाग महत्त्वाचा असतो. त्यासाठी लोकसहभाग वाढवणे गरजेचे आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. मुख्य अतिथी व मार्गदर्शक म्हणून लाभलेले गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी निपूण भारत, भारतीय संविधान, परीक्षा पे चर्चा याविषयी मार्गदर्शन केले. निपूण भारत, विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर वाढवणे, जास्त प्रभावी शैक्षणिक साहित्यांचा वापर करुन अध्यापन केल्यास विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता वाढते. त्यांच्यामध्ये कूवत निर्माण होते. चिकीत्सक बुध्दिमत्तेला चालना मिळते. त्यासाठी शिक्षकांनी अध्यापनात जास्तीत जास्त शैक्षणिक साहित्य वापरावे असे सांगितले. तसेच आपले पंतप्रधान मोदीजी यांचा जो उपक्रम आहे परीक्षा पे चर्चा या उपक्रमाबाबत सर्व शिक्षकांनी व उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी नोंदणी करावी. व नोंदणी केल्यानंतर आपले मत व्यक्त करुन सहभाग नोंदवावा असेही आवाहन केले. तसेच भारतीय संविधान अमृत महोत्सवानिमित्त संविधान उपक्रम प्रत्येक महिन्यामध्ये दिलेल्या कार्यपध्दतीनुसार सर्व शाळांमध्ये राबवून त्याचा इतिवृत्तांत ठेवावा व विद्यार्थ्यांना संविधानाविषयी दररोज परिपाठामध्ये माहिती द्यावी. जेणेकरुन त्यांना आपल्या भारताचे संविधान याविषयी माहिती मिळेल असे सांगितले. बीड जिल्ह्यामध्ये व्ही-स्कूल या ॲप मार्फत विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर प्रत्येक महिन्याला नोंदवला जातो. तो अध्ययन स्तर सर्वांनी प्रत्यक्ष चाचपणी करुनच विद्यार्थी नोंदवावा व विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर वाढवावा. सर्वांनी आपल्या शाळेची गुणवत्ता वाढवण्यासाठी व विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर वाढवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे असेही शेवटी ते म्हणाले. सदरील शिक्षण परिषदेमध्ये तज्ञ मार्गदर्शक म्हणून डोरले सर, खटावकर सर, दुधाने सर, राठोड सर, मुंडे सर यांनी दिलेल्या विषयानूसार मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक वनवे सर यांनी केले. सदरील कार्यक्रमा साठी केंद्रातील सर्व शिक्षक उपस्थित होते. सदरील शिक्षण परिषद यशस्वी करण्यासाठी भाऊसाहेब राठोड, मदन सवासे, रामचंद्र मुंडे, बर्गे मॅडम, केदार मॅडम यांनी परिश्रम घेतले. शेवटी सर्व उपस्थितांचे आभार केदार मॅडम यांनी मानले व पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# जिजामाता विद्यालयात जिजाऊ क्रिडा महोत्सवास उत्साहात प्रारंभ





तेलगाव:प्रतिनिधी

तेलगाव येथील जिजामाता प्राथमिक विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या जिजाऊ क्रिडा महोत्सवास बुधवारी मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला.या महोत्सवात विद्यालयाच्या बहुतांश विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

बीड जिल्हयाच्या शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या तेलगाव ता.धारूर येथील जिजामाता प्राथमिक विद्यालयात प्रतिवर्षी प्रमाणे याहीवर्षी जिजाऊ जयंती निमित्त जिजाऊ क्रिडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.या क्रिडा महोत्सवाचे उद्घाटन दि.१५ जानेवारी रोजी अखिल भारतीय पत्रकार परिषदेच्या डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्य मास्टर ट्रेनर तथा राज्य पंच नितीन पुटवाड होते.व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष दिपक लगड, केंद्रप्रमुख श्रीराम आपेट, पत्रकार बालाप्रसाद जाजू, आदि मान्यवर होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी राजमाता जिजाऊ व महाराष्ट्र केसरी स्व.खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राज्य पंच नितीन पुटवाड म्हणाले की,विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमासोबतच क्रिडा विषयाचेही ज्ञान प्राप्त गरजेचे आहे.त्यामुळे हे विद्यार्थी खेळाडु भविष्यात क्रिडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत स्वतःसह शाळेचे नाव लौकिक करतात. विद्यार्थ्यांनीही सतत विविध खेळात सहभाग नोंदवावा. असे आवाहन ही पुटवाड यांनी केले.तर डिजिटल मिडियाचे राज्य प्रमुख अनिल वाघमारे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की,बीड जिल्हयाच्या शैक्षणिक क्षेत्रात जिजामाता विद्यालयाने आपले आगळवेगळे स्थान निर्माण करत जिजामाता विद्यालयच एक ब्रॅन्ड केला. त्यामुळे संस्थापक अध्यक्ष दिपक लगड व त्यांच्या सर्व शिक्षकांचे खरोखर कौतूक करावे.तेवढे थोडेच असुन, हे विद्यालय क्रिडा स्पर्धेसह नेहमीच विविध स्पर्धेत ही अग्रेसरच असते.या विद्यालयात दरवर्षी जिजाऊ क्रिडा महोत्सवाचे आयोजन केले जाते.हे प्रशंसनीय असुन, यामुळे विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या खिलाडु वृत्तीला वाव मिळत असल्याचे वाघमारे म्हणाले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका श्रीमती सोळंके मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली क्रिडा शिक्षक राउत यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.सूत्रसंचालन गायकवाड सर तर आभार क्रिडा शिक्षक राउत यांनी मानले.

# लो.टिळक विद्यालयात नामविस्तार दिन

वडवणी : प्रतिनिधीं

येथील लोकमान्य टिळक महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ३१ वा नामविस्तार दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे अध्यक्ष श्री पंजाबराव मस्के तसेच प्राचार्य डॉ. के. एम. पवार, उपप्राचार्य, डॉ. बी. जी कुलकर्णी उपस्थित होते प्रमुख पाहुणे म्हणून साप्ताहिक डोंगरचा राजाचे संपादक श्री. अनिल वाघमारे हे होते. यावेळी राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन म ान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.आपल्या प्रास्ताविक भाषणात प्राचार्य डॉ. के. एम. पवार यांनी डॉ. बाबासाहेबांचे नाव विद्यापीठाला देण्यासाठी १७ वर्षे लढा द्यावा लागला. प्राण व वित्तहानी मोठ्या प्रमाणावर झाली. शेवटी १४ जानेवारी

१९९४ ला विद्यापीठाची फाळणी झाली. एका विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद य दुसऱ्याला स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड असे नाव देण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात विद्यापीठ नामांतराचा लढा हा शोषित वर्गाने आपल्या हक्कासाठी उभारलेले जन आंदोलन होते. नामांतराचा लढा हा केवळ विद्यापीठाची पाटी बदलणारा नव्हता तर तो समता, स्वातंत्र्य, बंधुभाव पुढे नेणारा होता. असे मत श्री. अनिल वाघमारे यांनी व्यक्त केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. पंजाबराव मस्के यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा ही दिलेली शिकवण प्रत्येकाने अंगीकारली पाहिजे, तरच समाजाचा व देशाचा विकास होईल असे मत व्यक्त केले. प्रस्तावना प्रा. भालेराव यांनी केली तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. अशोक खेत्री यांनी केले.

# राष्ट्रमाता जिजाऊ यांची वैष्णवी महाविद्यालयामध्ये जयंती साजरी

वडवणी: साहेबराव मस्के पाटील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वैष्णवी महाविद्यालयामध्ये राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शामसुंदर गुळवेले होते.तर प्रमुख वक्ते म्हणून रसायनशास्त्र विभागाचे प्रा. परमेश्वर शेंडगे होते. प्रमुख वक्त्यांनी आपल्या भाषणांमध्ये राष्ट्रमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना कसे घडवले हे उपस्थित विद्यार्थ्यांना सांगितले.हे सर्व विद्यार्थी मंत्रमुग्ध होऊन ऐकत होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वन्यजीव भागाच्या प्रा. डॉ. रेखा चौधरी मॅडम यांनी केले तर अभार शारीरिक शिक्षण निर्देशक प्राध्यापक डॉ . धनंजय खोसे यांनी मांडले

# वडवणी येथे जागतिक युवा दिन उत्साहात साजरा

वडवणी : प्रतिनिधी

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था,वडवणी येथे दि.१२ जानेवारी २०२५ रोजी जागतिक युवा दिन स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीचे औचित्य साधून उद्योजकता प्रेरणा कार्यक्रम संपन्न झाला. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य बनगे एस.ओ.यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक युवा दिनानिमित्त संस्थेतील यशस्वी उद्योजक माजी विद्यार्थी व संस्थेमध्ये आयोजित केलेल्या रांगोळी,क्रिकेट,निबंध स्पर्धेमध्ये प्रथम,द्वितीय,तृतीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व पुष्पगुच्छ,शाल देऊन गौरव करण्यात आला.


साप्ताहिक
# डोंगरचा राजा
शुक्रवार, दि. १७ जानेवारी २०२५ । पान ३







# रुई पिंपळा येथे गहिनीनाथ यात्रेनिमित्त रंगल्या भव्य दिव्य जंगी कुस्तीच्या दंगली





वडवणी:प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील रुई पिंपळा येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी तिन दिवसीय गहिनीनाथ यात्राचे सुरेख नियोजन करण्यात आले होते. यावेळी भव्य कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते. ही प्रथा गेल्या अनेक वर्षापासून रुई पिंपळा येथे प्रथा जपली जात आहे. याहीवर्षी देखील मोठ्या उत्साहात महाराष्ट्र केसरी पैलवान सय्यद चाऊस यांच्या उपस्थितीत कुस्त्यांच्या दंगली पार पडल्या आहेत. या विशेष कुस्ती सामने कार्यक्रमासाठी माजी आमदार श्री. केशवदादा आंधळे साहेब, महाराष्ट्र केसरी पै.श्री. शिवाजीराव केकान, बीड जिल्हा कुस्तीगीर व मल्ल संघाचे उपाध्यक्ष श्री. शिवशंकर अण्णा कराड, तसेच जेष्ठ उस्ताद श्री. बाळूभाऊ आवारे साहेब, माजी सरपंच श्री. शंकरराव आंधळे, माजी क्रीडा शिक्षक श्री. मधुकर धस सर, प्रशासकीय अधिकारी श्री. शैलेश आंधळे, जेष्ठ मुकादम श्री. कांताबापू आंधळे, जेष्ठ वकील . श्री. आबासाहेब आंधळे, जेष्ठ वकील श्री. प्रभाकर आंधळे, पै. महादेव मुजमुले, ई प्रमुख उपस्तिथी होते.

याबाबत अधिक माहिती अशी की, रुई पिंपळा येथे तिन दिवसीय गहिनीनाथ यात्राचे उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पहिल्या दिवशी संदल कार्यक्रम पार पडला

तर दुसऱ्या दिवशी गहिनीनाथाच्या दर्शनासाठी हजारो भाविक भक्तांची गर्दी केली होती. या यात्रा उत्सवात विविध खेळण्याच्या दुकाना व आकाश पाळणे विविध प्रकारचे मोठमोठ्या दुकाणा आसतात रात्री कला मंडळ असे विविध सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच तिसऱ्या दिवशी भव्य कुस्त्यांचे आयोजन महाराष्ट्र केसरी पैलवान सय्यद चाऊस यांच्या उपस्थितीत

केले होते. लहान मुलांपासून ते मोठ्या व्यक्तींच्या कुस्त्या पार पडल्या. यावर्षी मराठवाड्यातून आलेल्या नामांकित कुस्तीगिरांमुळे कुस्तीशौकिनांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारी कुस्त्या ठरल्या. यामध्ये मुलींच्या कुस्तीने उपस्थित त्यांचे मन वेधले होते. कुस्तीची सुरुवात १० रु पासून ते १७ हजार रुपये पर्यंत बक्षीस देण्यात आले आहे. आनंदाच्या वातावरणात कुस्त्या पार पडल्या आहेत. यामध्ये मराठवाड्यातील पैलवान मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शेवटी नामांकित कुस्तीपटू यांच्या आकर्षक कुस्त्या घेण्यात आल्या आणि शेवटी विजयी ठरलेल्या कुस्तीपटूला मान्यवरांच्या हस्ते नगदी १७ हजार रुपये देण्यात आले आहे. यावेळी रुई पिंपळा सह पंचक्रोशीतील कुस्तीशौकिनांनी कुस्त्याचा आनंद घेतला आहे. गहिनीनाथ यात्रेचे चोख व सुरेख नियोजन रुईचे युवा सरपंच मयुरशेट आंधळे व रुई ग्रामस्थ आणि गहिनीनाथ यात्रा उत्सव समितीने माजी आमदार केशवराव आंधळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिनकरराव आंधळे, शंकरराव आंधळे, माजी सरपंच संजयभाऊ आंधळे, यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. शेवटी परिसरातील नावजलेले कुस्ती वस्ताद यांना समितीच्या वतीने मानधन देऊन सत्कार करुन गौरव करण्यात आला आहे. या कुस्ती सामने कार्यक्रमसाठी विशेष करून गावातील तरुण मंडळी व यात्रा उत्सव समितीने खुप परिश्रम घेतले. याबद्दल सगळयात शेवटी सरपंच श्री. मयूरशेट आंधळे यांनी पोलिस प्रशासन कर्मचारी, यात्रा समितीचे पदाधिकारी, विश्वस्त,व सर्व टीम चा सत्कार करुन आभार मानले. व पुढील वर्षीचा कार्यक्रम याही पेक्षा मोठा करु असे आश्वासन दिले.

** महाराष्ट्र केसरी पै.सय्यद चाऊस विशेष यांची उपस्थिती
** जुने महाराष्ट्र केसरी श्री. पै. शिवाजीराव केकान यांची पण प्रमुख उपस्थिती
** सावित्रीच्या लेकीच्या कुस्तीने उपस्थितांचे मन वेधले
** तिन दिवसीय यात्रेला हजारो भाविक भक्तांची उपस्थिती
** युवा सरपंच मयुरशेट आंधळे यांनी केले चोख नियोजन
** मराठवाड्यातील जवळपास ७०० ते ८०० पैलवानांनी घेतला सहभाग

# वैष्णवी महाविद्यालयामध्ये नाम विस्तार दिन साजरा

वडवणी: प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नित व साहेबराव मस्के पाटील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वैष्णवी महाविद्यालया मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ३१ वा नामविस्तार दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शामसुंदर गुळभिले , तर प्रमुख वक्ते म्हणून मराठी विभागाचे प्रा.डॉ. होके कैलास होते.प्रमुख वक्त्यांनी आपल्या भाषणा मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर हे सहजासहजी झालेले नसून त्यासाठी अनेकांनी आपले बलिदान दिलेले आहे.आणि त्यांचे बलिदान म्हणजे आज आपल्या विद्यापीठाचा नाम विस्तार होय असे त्यांनी प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भौतिकशास्त्र विभागाचे प्रा.दत्ता सरवदे यांनी सूत्रसंचालन वाणिज्य विभागाचे प्रा. डॉ. बाळासाहेब राजमाने यांनी केले.तर आभार इंग्रजी विभागाचे प्रा. सतीश फुन्ने यांनी मांडले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# दरोडा टाकण्याच्या पुर्वतयारीत असलेली ७ जणांची टोळी शहर पोलीसांकडुन जेरबंद



माजलगाव :प्रतिनिधी

शहरातील पो.स्टे. हद्दीत रात्री गस्त करीत असतांना गोपनिय माहीती मिळाली की,साठे चौक इंदिरानगर माजलगांव येथे काही लोक दरोडा टाकण्याच्या पुर्वतयारीनीशी एका स्कॉर्पीओ वाहनामध्ये अंधारामध्ये थांबलेले असल्याची माहीती मिळाल्याने त्यांनी पोलीस स्टाफसह तेथे जावुन दिनांक १४ पहाटे ४:०५ वाजता पडताळणी केली असता एका काळ्या रंगाच्या स्कॉर्पीओ वाहना मध्ये १)लक्ष्मण सोपान कदम,वय २७ वर्षे रा. टाकरवण ता.माजलगांव जि.बीड २) खालेद सय्यद अनिस,वय २६ वर्षे,रा.फुलेपिंपळगांव ता. माजलगांव जि.बीड ३)शहानवाज एजाजबाबर शेख,वय ३४ वर्षे रा.राजगल्ली माजलगांव ४)गणेश हनुमान नाईकनवरे वय २३ वर्षे,रा. टाकरवण ता.माजलगाव ५) दत्ता राजेभाऊ घाटे,वय २५ वर्षे रा.श्रृंगारवाडी ता.माजलगाव ६)शरद अर्जुन नाडे,वय २५ वर्षे,रा.शिवणगांव ता.घनसावंगी जि.जालना ह.मु.टाकरवण ता.माजलगाव जि.बीड ७)शेख उमेर पाशा,वय २२ वर्षे रा.राजगल्ली माजलगांव ता.माजलगाव जि.बीड असे तोंड बांधुन स्थीतीत दरोडा टाकण्याच्या पुर्वतयारीसह संघटीतरित्या मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन एक स्कॉर्पीओ वाहन पासिंग क्रमांक -०४--७१११ असा असलेले किंमत १० लाख रुपयाचे,वेगवेगळ्या कंपनीचे ७ मोबाईल किंमत १ लाख सतरा हजार रुपयाचे,नगदी ७९०/- रुपये,तसेच एक लोखंडी पाईप,एक लोखंडी रॉड,एक प्लास्टीकची काठी,एक लाकडी स्टंप,५ फुट नायलॉनची दोरी,मिर्ची पाऊडर असे ४५० रुपयाचे साहीत्य असा एकुण ११ लाख १८ हजार २४०/-रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यांच्या विरुध्द गु.र.नं.१५/२०२५ कलम ३१०(४), ३१०(५)भारतीय न्याय संहीता -२०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.







## जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१५/०१/२०२५ फा.क्र.११७/२०२५
अर्जदाराचे नाव १) श्री. गणेश तुळशीराम घुमरे
विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव १) श्रीमती. सरला अजय लुंकड (जैन)
प्रकरणः नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र.५२७ लॉट नं.४१ मिळकत क्र. वडवणी येचील आहे.
सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत /वारसा वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.
आकारः १) पूर्व-पश्चिम ०९.०० मी. व दक्षिणोत्तर ०६,०० मी. एकुण क्षे.५४.०० चौ.मी.,पूर्वः-लॉट नं. ३०,पश्चिमः-६ मीटर रस्ता
दक्षिणः- लॉट नं. ४२,उत्तर:- लॉट नं. ४०
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही,
**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

## जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१५/०१/२०२५, फा.क्र.११३/२०२५
अर्जदाराचे नाव १) श्री. विलास भुमा चव्हाण
विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव १) श्री. रोहीदास रघुनाथ पवार
प्रकरणः नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र.४२६ लॉट नं.३३ मिळकत क्र. वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत वारसा वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.
आकारः १) पुर्व-पश्चिम १२.०० मी. व दक्षिणोत्तर ७.५० मी. एकुण क्षे. ९०.०० चौ.मी.
पूर्वः-रस्ता,पश्चिमः- प्लॉट नं. २८
दक्षिणः- प्लॉट नं. ३४, उत्तरः- प्लॉट नं. ३२
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.
**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

## जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१४/०१/२०२५ फा.क्र.१०७/२०२५
अर्जदाराचे नाव १) श्री. गोविंद विष्णुपंत मुंडे
विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव १) श्रीमती. रेखा बबन आवाड
प्रकरणः नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र.३९९ लॉट नं.२३ मिळकत क्र.७०५३ वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारसा / वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.
आकारः १) लांबी पुर्व-पश्चिम ३० फुट. व रुंदी दक्षिणोत्तर ३० मी. एकुण क्षे.८३.६४ चौ.मी.
पुर्वः- १५ फुट रस्ता, पश्चिमः- मुंडे
दक्षिण:- २० फुट रस्ता, उत्तर:- प्लॉट नं. २७
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.
**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

## जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१४/०१/२०२५ फा.क्र.१०४/२०२५
अर्जदाराचे नाव १) श्रीमती. पार्वती केशव गव्हाणे
विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव १) श्री. मुस्तकिन नन्दुमिया शेख
प्रकरणः नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र.५२६ लॉट नं.१३ मिळकत क्र. वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत /वारसा / वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.
आकारः १) पुर्व-पश्चिम ०७.५५ मी. व दक्षिणोत्तर ११.५० मी. एकुण क्षे.८७.४० चौ.मी.
पुर्वः-प्लॉट नं. १४,पश्चिमः- प्लॉट नं. १२
दक्षिणः- गट नं. ५२७ चा भाग,उत्तरः-रस्ता
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.
**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

## जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१४/०१/२०२५ फा.क्र.१०२/२०२५
अर्जदाराचे नाव १) श्रीमती. अनिता दिलीप कुलभैया
विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव १) श्री. मुस्तकिन नन्हुमिया शेख
प्रकरणः नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र.५२६ लॉट नं.१४ मिळकत क्र. वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत /वारसा / वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.
आकार: १)
पुर्व-पश्चिम ०७.६५ मी. व दक्षिणोत्तर ११.५० मी. एकुण क्षे.८७.४० चौ.मी.,पूर्वः-प्लॉट नं. १५,पश्चिमः- प्लॉट नं. १३
दक्षिणः- गट नं. ५२७ चा भाग,उत्तरः-रस्ता
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.
**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

## जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१४/०१/२०२५ फा.क्र.१०२/२०२५
अर्जदाराचे नाव १) श्रीमती. अनिता दिलीप कुलभैया
विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव १) श्री. मुस्तकिन नन्हुमिया शेख
प्रकरणः नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र.५२६ लॉट नं.१४ मिळकत क्र. वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत /वारसा / वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.
आकार: १)
पुर्व-पश्चिम ०७.६५ मी. व दक्षिणोत्तर ११.५० मी. एकुण क्षे.८७.४० चौ.मी.,पूर्वः-प्लॉट नं. १५,पश्चिमः- प्लॉट नं. १३
दक्षिणः- गट नं. ५२७ चा भाग,उत्तरः-रस्ता
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.
**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

## जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१४/०१/२०२५ फा.क्र.१०६/२०२५
अर्जदाराचे नाव १) श्रीमती. आशामती पांडुरंग शिंदे
विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव १) श्रीमती. इंदुबाई भिकचंद उदावंत
प्रकरणः नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं. गट क्र. लॉट नं. मिळकत क्र. २४१६ वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारसा वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.
आकार: १) पुर्व-पश्चिम २८.०० मी. व लांबी दक्षिणोत्तर २५.०० मी. एकुण क्षे.६५.०५ चौ.मी.,पूर्वः-रेडेकर वगैरे,पश्चिमः- २० फुट रस्ता
दक्षिणः- राकुसले, उत्तरः-नांदे यांची जागा
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.
**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

## जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१५/०१/२०२५ फा.क्र.११४/२०२५
अर्जदाराचे नाव १)श्री. गोपीनाथ सटवा सावंत
विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव १) श्री. अनिल संतोष शेळके
प्रकरणः नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र.६५७ लॉट नं. मिळकत क्र.४६६४ वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत /वारसा वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.
आकारः १) पुर्व-पश्चिम १५.०० फु. व दक्षिणोत्तर ४० फु. एकुण क्षे.५५.७६ चौ.मी.
पुर्वः- जगन्नाथ गोपीनाथ सावंत,पश्चिमः- अशोक रघुनाथ शिंदे
दक्षिणः- नाला,उत्तरः-बीड परळी हायवे रोड
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.
**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

## जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१५/०१/२०२५फा.क्र.११६/२०२५
अर्जदाराचे नाव १) श्री. सतिश रामकिसन मुंडे
- विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव १) श्रीमती. सरला अजय लुंकड (जैन) २) श्री. सिध्दार्थ अजय लुंकड (जैन) ३) श्री. अनिकेत अजय लुंकड (जैन) विक्रेता नं.१ व २ चा मु आ.म्हणुन
प्रकरणः नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र.५२९ लॉट नं.११ मिळकत क्र. वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत /वारसा वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.आकारः १) पूर्व-पश्चिम ०९.०० मी. व दक्षिणोत्तर ०९.०० मी. एकूण क्षे.८१.०० चौ.मी.,पूर्वः-९ मीटर रस्ता, पश्चिमः- गट नं. ५२८दक्षिण:- ६ मीटर रस्ता, उत्तरः- गट नं. ५२९
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.
**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

## जाहिरनामा
**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१५/०१/२०२५ फा.क्र.११५/२०२५
अर्जदाराचे नाव १) श्री. अतुल संतराम काळे
विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव १) श्री. महेश राजेभाउ मुंडे
प्रकरणः नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./गट क्र.६३७ लॉट नं. २१ मिळकत क्र. वडवणी येथील आहे.
सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत वारसा वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.
आकारः १) पूर्व-पश्चिम १२.०० मी. व दक्षिणोत्तर ७.५० मी. एकुण क्षे. ९०.०० चौ.मी.
पुर्वः-दिनकर, पश्चिमः- ६ मीटर रस्ता
दक्षिणः- प्लॉट नं. २२, उत्तरः- प्लॉट नं. २०
याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.
**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
शुक्रवार, दि. १७ जानेवारी २०२५ । पान ४

### मनिषा बिक्कड यांना मातृभुमी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार

बीड :मातृभुमी प्रतिष्ठान च्या वतीने सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल मनिषा बिक्कड यांना मातृभुमी राज्यस्तरीय आदर्श पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले.या पुरस्काराचे वितरण नुकतेच डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड येथे विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. मनिषा बिक्कड या गत दहा वर्षापासून अनेक सामाजिक क्षेत्रामध्ये व शैक्षणिक क्षेत्रात आणि व्यसनमुक्ती क्षेत्रात सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२४ सन्मानीत करण्यात आला.दोन ऑक्टोबर २०२२ रोजी श्री एस के साहेब आयुक्त समाज कल्याण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्त व्यसनमुक्ती सेवाधुत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते तसेच ब्रेन वे रिसर्च फाउंडेशन या संस्थे अंतर्गत समुपदेशन क्षेत्रामध्ये अनेक सेवा पुरवल्याबद्दल त्यांना पुरस्कार व ट्रॉफी देण्यात आलेल्या आहेत.

# मराठी पत्रकार परिषदेच्या पुरस्कार वितरण सोहळ्यात सहभागी व्हावे

## प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांचे आवाहन; डिजिटल मिडिया परिषदेची बुलढाण्यात जिल्हास्तरीय बैठक उत्साहात







बुलढाणा:प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा.श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार मराठी पत्रकार परिषद संलग्नित असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेची बुलढाणा जिल्हा स्तरीय बैठक प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली.मागील दोन वर्षात डिजिटल मीडिया परिषदेच्या माध्यमातून बुलढाणा जिल्ह्यात संघटक संघटनात्मक सक्रिय काम केल्याबद्दल खामगाव येथील ज्येष्ठ पत्रकार बळीराम वानखडे तर तसेच चिखली येथील डिजिटल मीडिया परिषदेचे तालुकाध्यक्ष सुनील मोरे राज्यस्तरीय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट पथक आणि त्या पुरस्कार मिळाल्याबद्दल नारायण दाभाडे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला तसेच मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंह राजपूत यांची नियुक्ती झाल्याबद्दल डिजिटल मीडिया चे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे व प्रदेश उपाध्यक्ष अनिल उंबरकर यांनी त्यांचा यथोचित सत्कार केला. बैठकीमध्ये बुलढाणा जिल्हा डिजिटल मीडियाच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. यामध्ये विभागीय



सचिव म्हणून जितेंद्र कायस्थ,घाटावर जिल्हाध्यक्ष झी २४ तास चे जिल्हा प्रतिनिधी मयूर निकम तर घाटाखालील जिल्हाध्यक्ष श्रीधर ढगे ओटीटी न्यूज चे संपादक जिल्हा सरचिटणीस दीपक मोरे,जिल्हा उपाध्यक्ष नारायण दाभाडे,

किशोर खंडारे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला न्यूज पोर्टल युट्युब चॅनेल च्या संपादक व पत्रकारांनी सत्य बातमी दाखवून लोकांमध्ये विश्वासाहर्ता वाढवावी असे आवाहन करून भविष्यात डिजिटलच्या पत्रकारांनी अधिस्वीकृती मिळाली पाहिजे,

यासाठी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम देशमुख सरांचे मार्गदर्शनात लढा सुरू असल्याचे सांगत येत्या एक फेब्रुवारी रोजी सेलू जिल्हा परभणी येथे होत असलेल्या आदर्श पुरस्कार वितरण सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन ही प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले.

यावेळी डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य उपाध्यक्ष अनिल उंबरकर, बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष शेख वसिमभाई,सरचिटणीस शेख कासिमभाई, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक राजेश डिखोळकर आदी मान्यवर व वडवणी येथील पत्रकार सुधाकर पोटभरे, पत्रकार महेश सदरे, पत्रकार धम्मपाल डावरे, पत्रकार विजय राऊत सह आदींची प्रमुख उपस्थिति होती.



# पुस्तक आणि झाड दिले संक्रातीचे वाण

## तिगावच्या सरपंच अर्चनाताई राज पाटील यांचा सामाजिक उपक्रम

वडवणी प्रतिनिधी

लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड राज पाटील हे मागील २५ वर्षापासून सामाजिक क्षेत्रामध्ये नावाजलेले व्यक्तिमत्व आहे. त्यांनी आपल्या गावात एक अनोखी मकर संक्रात साजरी केली. या मकर संक्रातीला गावातील सुमारे ५०० महिलांना त्यांनी संक्रातीचे वाण दिल. या वाणामध्ये केवळ भेटवस्तूच नाही तर तिळगुळा सोबतच पुस्तक आणि एक झाड महिलांना भेट दिली. त्यांच्या या उपक्रमाचे संपूर्ण बीड जिल्ह्यात कौतुक होत आहे.

एडवोकेट राज पाटील हे मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे विश्वासू सहकारी आहेत. मराठा आरक्षण लढ्यामध्ये मागील चार वर्षापासून ते जरांगे पाटील यांच्यासोबत काम करत आहेत. लढा दुष्काळाशी फाउंडेशनच्या माध्यमातून तसेच वडवणी तालुका विकास समिती यासारख्या संघटनेचे नेतृत्व करत असताना मागील पंचवीस वर्षात राज पाटील यांनी सामाजिक क्षेत्रामध्ये खूप मोठे काम केले आहे.

### गावातल्या प्रत्येक महिलेच्या सन्मानासाठी प्रयत्न करणार

मी तीगावची सरपंच असले तरी गावातील सर्व सामान्य माता माऊल्या माझ्या मार्गदर्शक आहेत. मी सर्व महिलांचा सन्मान करूनच गावाचा कारभार करत आहे. या गावातील प्रत्येक महिलेचे विचार आणि स्वातंत्र्य अबाधित राहण्यासाठी मी प्रयत्न करत आहे. कोणत्याही महिलेला त्याच्या हक्क आणि अधिकारापासून दूर ठेवले जाणार नाही याची काळजी मी घेत आहे. गावातील सर्व महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. प्रत्येक महिलेच्या घराघरात महापुरुषांचे विचार गेले पाहिजेत जिजाऊ, सावित्रीबाई, रमाई, अहिल्याबाई, फातिमा, संत जनाबाई, संत ज्ञानेश्वर, तुकोबाराय यांचे विचार घराघरात पोचविण्यासाठी महिलांना आवश्यक आहे ते सर्व साहित्य मी पुरवणार असल्याचे सरपंच अर्चनाताई राज पाटील यांनी व्यक्त सांगितले.

निसर्ग आणि मानवता या दोन गोष्टीची सांगड घालून त्यांनी नेहमी वृक्ष संवर्धन आणि वैचारिक देवाण घेऊन यावर भर दिला आहे.

त्यांनी आतापर्यंत बीड जिल्ह्या आणि जिल्ह्याबाहेर देखील लाखो झाडांची लागवड केली आहे. आतापर्यंत त्यांनी लाखो लोकांना माता जिजाऊ, छत्रपती शिवराय, छत्रपती संभाजी महाराज, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई, माता अहिल्याबाई, माता फातिमा, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, स्वामी विवेकानंद यासारख्या महान व्यक्तींचे चरित्रांचे पुस्तके वाटलेले आहेत. एवढेच नाही तर संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, तुकडोजी महाराज, गाडगेबाबा यासारख्या संतांचे विचार घराघरात पोहोचविणारे ग्रंथ देखील त्यांनी सांप्रदायिक क्षेत्रामध्ये वाटलेले आहेत.

मकर मकर संक्रांतीच्या शुभ सण त्यांनी अनोख्या पद्धतीने साजरा करण्याचा पायंडाच आपल्या गावात पाडला आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी त्यांनी आपल्या गावात मकर संक्रांतीच्या सणाच्या निमित्ताने तिळगुळ आणि भेटवस्तू सोबतच झाडे आणि महापुरुष, संतांचे विचाराचे पुस्तके गावातील मातामावल्यांना वाटले. या संक्रातीच्या निमित्ताने गावातील शांतता सुख समाधान आणि भरभराटी टिकून राहावी आणि एकोपा

जर राहिला तर गाव यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास एडवोकेट राज पाटील यांनी व्यक्त केला. त्यांच्या पत्नी सौ. अर्चना राज पाटील विद्यमान सरपंच आहेत आपल्या पतीच्या सामाजिक कार्याला त्यांचा खूप मोठा हातभार आहे. गावाचा विकास आणि निसर्ग संवर्धन हे पतीचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी मेहनत घेत असल्याचे एडवोकेट राज पाटील यांच्या पत्नीं सौ अर्चना पाटील यांनी सांगितले.



*महाराष्ट्र राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री मा. ना.जयकुमार रावल साहेब यांना तालुका दोंडाईचा जिल्हा धुळे येथे वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना कृषी उत्पन्न बाजार समिती सचिव संघ महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष शेगाव बाजार समितीचे सचिव सचिव विलासराव फुंडकर, अमरावती विभागाचे सदस्य तथा सचिव दीपक विजयकर, लातूर विभागाचे सदस्य तथा माजलगाव बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे व दोंडाईचे सचिव पंडित पाटील

# विवेकानंदांच्या विचारांची प्रेरणा घेऊन वाटचाल करावी :प्रा.डॉ. अशोक देवगुडे

## वडवणी येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उद्योजकता प्रेरणा

वडवणीः प्रतिनिधी

युवकांनी स्वामी विवेकानंदांच्या विचार व कार्याची प्रेरणा घेऊन भविष्यातील वाटचाल करावी असे प्रतिपादन प्रसिद्ध वक्ते प्रा.डॉक्टर अशोक देवगुडे यांनी केले ते वडवणी येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे उद्योजकता प्रेरणा कार्यक्रम व राष्ट्रीय युवा दिन व राष्ट्रमाता जिजाऊ जयंती कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की स्वामी विवेकानंदांनी युवकांना प्रेरित करण्यासाठी आत्मविश्वास, योग, ध्यान, स्वदेश, प्रेम व राष्ट्रनिष्ठा आणि समाजसेवा या मूल्यांची युवकांनी अंगीकार करावा असे युवकांना त्यांनी आवाहन केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र शासनाचा उद्योजकता पुरस्कार प्राप्त युवा उद्योजक श्री. बाबासाहेब कुरकुटे हे होते. तर प्रमुख उपस्थित म्हणून वडवणी शहराचे नगराध्यक्ष मा. श्री. शेषराव जगताप साहेब यांची उपस्थिती होती तसेच व्यासपीठावर मार्गदर्शक प्राध्यापक गंगाभीषण अंडील, उद्योजक श्री देशपांडे साहेब व प्राध्यापक इंगोले बी.एस. यांची उपस्थिती होती.

प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्तावित प्राध्यापक श्रीमती देशपांडे मॅडम यांनी केले. यानंतर प्रा. गंगाभीषण अंडील यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला प्रमुख अतिथी नगराध्यक्ष श्री.शेषराव जगताप यांनी जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त शुभेच्छा देऊन या सर्व प्रशिक्षणार्थ्यांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या अध्यक्ष समारोप करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री बाबासाहेब कुरकुटे यांनी उद्योग उभा करताना येणाऱ्या अडचणी या अडचणींना न डगमगता आपलं ध्येय प्राप्त करण्यासाठी आपण सुरू केलेला उद्योग याची भरभराटी कशी होईल याचा मूलमंत्र दिला या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने विविध घेतलेल्या स्पर्धेचे बक्षीस वितरण अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते करण्यात आले या कार्यक्रमाचे संचलन श्री मुळे के. एस. यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य मा.श्री. बनगे एस.ओ. यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा राठोड एस. एल., श्री.मुळे के. एस. प्रा श्रीमंती देशपांडे एल.एस., प्रा. मोमिनियम एम. एच., उच्वेय डी. एल., कुमारी ठोंबरे एस.डी., मुंडे के. एम., पठाण एम., सुरवसे एम. ए ,श्री.केदार एम.बी. आंधळे एफ.एम आदींनी अथक परिश्रम घेतले शेवटी या कार्यक्रमाचे आभार श्री मुळे के. एस. यांनी व्यक्त केले या कार्यक्रमास शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सर्व कर्मचारी वृंद व वडवणी शहरातील युवा उद्योजक व बहुसंख्य विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या.



# शिस्तबध्द ग्रंथदिंडीने परळीकरांचे लक्ष वेधले!

परळी :प्रतिनिधी

होमहवण, ग्रंथदिंडी, प्रसिद्ध बालकीर्तनकार ह.भ.प.जनाई महाराज कोकाटे संगमकर यांचे काल्याचे किर्तन व महाप्रसादाने गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या श्री रामलिंग चौंडेश्वरी देवांग पुराण पारायणाची सांगता मोठ्या थाटा- माटात पार पडला. कोष्टी समाजाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमांचा परळी व पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घेतला. शिस्तबध्द पध्दतीने निघालेल्या ग्रंथदिंडीकडे परळीकरांचे लक्ष वेधले. श्री रामलिंग चौंडेश्वरी मातेचा व रामकुष्ण हरी च्या जयघोषाने परळी नगरी दणाणली होती. टाळ- मृदंगाने सर्वजण मंत्रमुग्ध झाले होते.

यावेळी बोलतांना प्रसिद्ध बालकीर्तनकार ह.भ.प.जनाई महाराज कोकाटे संगमकर यांनी पुण्यवंत व्हावे घेता सज्जनांचे नावे नेघे माझी वाच्या तुटी महालाभ फुकासाठी विश्रांतीचा ठाव पायी संतांचीया भाव तुका म्हणे पापे जाती संताचीय जपे या अभंगावर चिंतन करतांना शाकंबरी चौंडेश्वरी देवी चे महत्व सांगून पुढे म्हणाल्या की, चौडेश्वरी देवी यांचे चामुंडा देवी शाकंबरी देवी असे एकूण ५२ शक्ती पीठ आहेत. चौडेश्वरी देवी ने दुष्काळात आपल्या शरीरात शांकभाजी निर्माण करून भक्तांना तारले म्हणून तिला शंकभरी असेही म्हणतात. तसेच तीर्थक्षेत्र बदामी येथे बनाच्या रम्य परिसरात स्थायिक झाल्यामुळे बनशंकरी असेही संबोधतात. या देवीचे अखिल भारतातील देवांग हटगर कोष्टी समाजाची श्री बनशंकरी देवी ही कुलदैवत मानली जाते असेही त्या म्हणाल्या.

शहरातील गुरूकृपानगर येथील श्री हनुमान मंदिर येथे दिनांक ७ जानेवारीपासून सुरू असलेल्या श्री रामलिंग चौंडेश्वरी देवांग पुराण पारायणची मान्यवरांच्या उपस्थीतीत ग्रथंपुजा करून प्रारंभ करण्यात आला होता. पारायण दररोज सकाळी ७ ते १० यावेळेत होत होते. या वेळी मोठ्या प्रमाणावर भाविकांची उपस्थीती लाभत होती. पारायण व्यासपीठ प्रमुख म्हणून सौ. शितल साबणे या होत्या. या सप्ताहाची सांगता दि.१३ जानेवारी २०२४ रोजी सकाळी होमहवण , १० ते १२ ग्रंथदिंडी, दुपारी १२ ते २ प्रसिद्ध बालकीर्तनकार ह.भ. प.जनाई महाराज कोकाटे यांचे काल्याचे किर्तन व त्यानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. किर्तनाचा व महाप्रसादाचा हजारों भाविकांनी लाभ घेतला.पालखी व ग्रंथदिंडीचे विविध ठिकाणी स्वागत-सप्ताहाच्या समारोपाप्रसंगी काढण्यात आलेल्या श्री रामलिंग चौंडेश्वरी देवीच्या प्रतिमेची पालखी व ग्रंथदिंडीचे विविध ठिकाणी रांगोळीची आरास व पुजा करून भाविकांनी दर्शन घेतले. टाळ- मृदंग, रामलिंग चौंडेश्वरी देवीचा जयघोष, रामकुष्ण हरिचा गजर, फुगडया, भजन याकडे परळीकरांचे लक्ष वेधले. या भक्तीमय वातावरणात अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अध्यक्ष ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांच्या सहभागामुळे आणखीन रंगत आली होती. उपस्थित ह .भ. प. गायनाचार्य भरत महाराज सोडगीर मृदंगाच्या बाळू महाराज , गायनाचार्य अश्विनीताई बडे व गुरुकृपा नगर मधील महिला भजनी मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तनाला साथ संगत केली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, **संपादक वाघमारे अनिल श्रीराम** यांनी प्रगती ऑफसेट, पंचशिलनगर, वडवणी, ता.वडवणी जि.बीड - ४३११४४ येथे छापून साप्ताहिक डोंगरचा राजा कार्यालय, मेन रोड, वडवणी, ता.वडवणी, जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. मो. ९४२२५९१८०५, फॅक्स : ०२४४३-२५७७८८, **निवासी संपादक : डॉ.एल.बी. वाघमारे** (*या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)